# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२२३
०२०–२५६०१३५३
०२०–२५६०१२६३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/माव्यप्र/५२९

दिनांक – ०१/१०/२०१८

## अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा. प्राचार्य,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व
नॉन–एआयसीटीई अभ्यासक्रमाची महाविद्यालये/संस्था.

विषय – **शैक्षणिक वर्ष सन २०१८–१९ ची माहिती व्यवस्थापन प्रणाली (M.I.S.) मध्ये ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत.**

संदर्भ – १. मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिस/सांख्यिकी/एमआयएस/२०१८–१९/१६८२३,दि. २७.०९.२०१८.

महोदय/महोदया,

राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र शासनास **सन २०१८–१९** या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम शिकवणा–या महाविद्यालयांकडून ऑनलाइन पध्दतीने विविध विवरणपत्रांमध्ये माहिती मागविण्यात येत आहे. **(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र व व्यवस्थापन इ. हे अभ्यासक्रम शिकविणा–या महाविद्यालयांना माहिती व्यवस्थापन प्रणाली लागू नाही.)**

**माहिती व्यवस्थापन प्रणालीचे काम करताना फक्त Internet Explorer हे browser वापरावे, त्याचे Version 8.0 & above असायला हवे. फक्त याच browser चा वापर करावा. इतर browser चा वापर करू नये अन्यथा भरलेली माहिती Save होणार नाही, याची सर्व संबंधित महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

**जर महाविद्यालयांनी माहिती व्यवस्थापन प्रणालीतील (M.I.S.) माहिती पूर्ण भरली नाही तर अशा महाविद्यालयांची नोंद शून्य प्रवेश झालेल्या महाविद्यालयांत करण्यात येईल त्यानंतर**

महाविद्यालयांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची सर्व महाविद्यालयांनी काळजीपूर्वक नोंद घ्यावी.

ज्या महाविद्यालयांनी **माहिती व्यवस्थापन प्रणालीतील (M.I.S.) सन २०१८–१९** मधील माहिती पूर्णपणे भरलेली आहे, अशा सर्व संबंधित महाविद्यालये/संस्थांनी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडे जमा करून ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे, याची महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी नोंद घ्यावी.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी ऑनलाइन पध्दतीने विवरणपत्रांमध्ये **दि. ३१ ऑक्टोंबर २०१८** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०–६५००१०१६, ६५००११७३, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०२०–२५६०१२२३, २५६०१३५३ यांच्याशी संपर्क साधावा किंवा महाविद्यालयांनी stat.dhepune@nic.in यावर इमेल करावा.

आपला,

Rasve 17x118

(मुं. वि. रासवे)
सहायक कुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष